<u>प्रेस नोट दिनांक १४/०९/२०१८</u>

**सराईत चोरटयाकडुन चोरीच्या १० गाडया जप्त हडपसर पोलीसांची कारवाई.**

दिनांक १३/०९/२०१८ रोजी हडपसर पोलीस स्टेशन येथील वाहनचोरीच्या अनुषंगाने हडपसर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना कवडीपाट टोळ नाका येथे दोन संशयित इसम मोटार सायकल नं. एम एच १२ एच जे १०५९ वरुन फिरताना मिळुन त्यांचे गाडीची कोणतीही कागदपत्रे नसल्याने त्यांना तपास पथकाने ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) अविनाश अशोक यादव,वय – २१ वर्षे,रा.नेवासा फाटा,नेवासा,अहमदनगर २) ज्ञानेश्वर माधव देवकर,वय १९ वर्षे,रा. ,रा.नेवासा फाटा,नेवासा,अहमदनगर असे सांगितले असुन त्यांचे कडे चौकशी केली असता त्यांनी सदर मोटार सायकल नं. एम एच १२ एच जे १०५९ हि हडपसर येथुन चोरी केली असल्याचे सांगितले म्हणुन त्यांचे कडे अधिक कसुन तपास करता त्यांनी तपासा दरम्यान यापुर्वी हडपसर येथुन २ दुचाकी १ चारचाकी, सांगवी येथुन १ दुचाकी, तसेच पुणे शहरामधुन इतर परीसरातुन ४ ते ५ दुचाकी, श्रीरामपुर, बदलापुर इत्यादी ठिकाणाहुन दुचाकी वाहने चोरल्याचे सांगितले आहे. सदर आरोपी हे नेवासा फाटा येथुन पुणे,ठाणे,अहमदनगर इत्यादी ठिकाणी जावुन दुचाकी चोरी करीत असल्याचे सांगितले आहे. सदर आरोपींविरुध्द औरंगाबाद शहर येथेही चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदर आरोपीकडुन हडपसर पोलीस स्टेशन तपास पथकाने आतापर्यंत **एकुण ९ दुचाकी व १ चारचाकी** जप्त केलेली आहे. सदर आरोपीस दिनांक १४/०९/२०१८ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो लष्कर यांचे समक्ष हजर करुन त्यांची पोलीस कस्टडीची मागणी करण्यात आली आहे.

सदर आरोपींकडुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

१) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.८९०/२०१८ भा.द.वि.क.३७९
२) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.९०५/२०१८ भा.द.वि.क.३७९
३) हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.९६४/२०१८ भा.द.वि.क.३७९
४) समर्थ पोलीस स्टेशन गु.र.नं.८२/२०१८ भा.द.वि.क.३७९
५) शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.१०४/२०१७ भा.द.वि.क.३७९
६) सांगवी पोलीस स्टेशन गु.र.नं.३३८/२०१८ भा.द.वि.क.३७९
७) बदलापुर पोलीस स्टेशन गु.र.नं.४२/२०१६ भा.द.वि.क.३७९
८) बदलापुर पोलीस स्टेशन गु.र.नं.१५४/२०१६ भा.द.वि.क.३७९
९) श्रीरामपुर पोलीस स्टेशन गु.र.नं.२०१/२०१८ भा.द.वि.क.३७९
१०)श्रीरामपुर पोलीस स्टेशन गु.र.नं.[illegible]/२०१८ भा.द.वि.क.३७९

पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन, पुणे

सदर कामगिरी हि सुनिल फुलारी,मा.अपर पोलीस आयुक्त सो पुर्व विभाग, प्रकाश गायकवाड, मा.पोलीस उप आयुक्त सो परि.५, मिलिंद पाटील सपोआ हडपसर विभाग, सुनिल तांबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोनि कुंभार, हडपसर पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सपोनि लोणारे, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोना/प्रताप गायकवाड, पोना/विनोद शिवले, पोशि/नितीन मुंढे, अकबर शेख,सैदोबा भोजराव, यांनी केली आहे.

हडपसर पोलीस स्टेशन विषेश वाहन चोरी तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक भांगे, पोना/प्रताप गायकवाड, पोना/विनोद शिवले, पोशि/नितीन मुंढे, अकबर शेख यांनी जानेवारी २०१८ ते आजपर्यंत एकुण ४५ चोरी व जबरी चोरीमधील आरोपींना अटक करुन त्यांचे कडुन एकुन ३४० चोरीची वाहने जप्त करुन पुणे शहर,पुणे ग्रामीण, अहमदनगर, बीड, सोलापुर, सातारा, जळगाव, अमरावती, उस्मानाबाद , इत्यादी ठिकाणचे ३०० हुन अधिक गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.